

Published by
Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.
9 781304 461148



Shikshan Prasarak Sanstha's



# Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,

Kavathe Mahankal, Dist: Sangli, Maharashtra, 416405

*Proceeding of One Day National Conference on*

## "Bridging Boundaries: Multidisciplinary Research in Science, Commerce and Humanities"

**ONLINE MODE**
**21st March 2024**

**Organized by**

Internal Quality Assurance Cell & Research Development Cell

**Principal**

Prof. (Dr.) M. K. Patil



| Mr. A. A. Kamble<br>Co-ordinator IQAC | Mr. A. S. Pawar<br>Co-ordinator<br>Research Development Cell | Mr. N. P. Shinde<br>Convener<br>Mob-8080955157 |
|---|---|---|

**Price: 600 /-**

**© 2024 by Author's**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN– 978-1-304-46114-8**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

**Printed by,**
**Laxmi Book Publication**,
258/34, Raviwar Peth, Solapur,
Maharashtra, India.
**Contact No.** : 9595359435
**Website:** http://www.lbp.world
**Email ID:** apiguide2014@gmail.com

| | | |
|---|---|---|
| 60. | **"SHIFTING PARADIGMS: GENDER REPRESENTATION IN MARATHI THEATRE WITHIN A MULTICULTURAL CONTEXT"**<br>Mr. Nitish Pandurang Shinde, [1] and<br>Mr. Shivbhushan V. Jadhav [2] | 280 |
| 61. | **THE INTERSECTION OF ART AND SCIENCE IN EDUCATION**<br>Mahammad Rauf Mahammad Ibrahim | 285 |
| 62. | **'घनसाळ' कथासंग्रहातील धर्मचिकित्सा**<br>प्रा.डॉ.मोहन गोविंद लोंढे | 289 |
| 63. | **छत्रपती शिवाजी महाराजांची आदर्श संदेशवहन यंत्रणा**<br>डॉ. मधुकर विठोबा जाधव | 293 |
| 64. | **नव्वदोत्तरी काळातील दलित स्त्रियांची आत्मकथने**<br>प्रा. अर्जुन बंडू राठोड | 298 |
| 65. | **भारताच्या वन विकासामध्ये शासकीय, अशासकीय संघटनांची आणि स्थानिक समुदायाची भूमिका**<br>Miss. Mane S.G. | 302 |
| 66. | **महिला सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान**<br>जितेंद्र मधुकर पेटकर , डॉ. विनोद मारोतराव मुडे | 307 |
| 67. | **उपेक्षित दुर्गरत्न- किल्ले कोळदुर्ग**<br>Mr. Hariprasad Vitthal Pawar | 312 |
| 68. | **"सातपुड्यातील आदिवासी लोकांच्या आरोग्याच्या स्थितीचा अभ्यास -विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा**<br>प्राचार्य.डॉ. दिलीप रामभाऊ जगताप , प्रा. रामदास रमेश वसावे | 315 |
| 69. | **"भारतातील कृषी क्षेत्रातील उद्योजकतेच्या संधी व त्यापुढील आव्हाने"**<br>श्री. श्रीनाथ महादेव शिंदे | 320 |
| 70. | **महाराष्ट्रातील सण-उत्सव ही निसर्ग संस्कृती**<br>डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार | 324 |

## महाराष्ट्रातील सण-उत्सव ही निसर्ग संस्कृती

**डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार**
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील, महाविद्यालय कवठेमहांकाळ,जि.सांगली
**भ्रमणध्वनी-** ८९९९५१५४००
**email.id:-** saraswatighogre@gmail.com

**प्रस्तावना:**

अनादी काळापासून निसर्गदिवतांची पूजा करणे निसर्गाच्या सानिध्यात राहून विविध चालीरीती बरोबर सर्व उत्सव साजरे करण्याची परंपरा दिसून येते सण-उत्सव हा लोकपरंपरेचा एक भाग असून ही लोक परंपरा पुरातन काळापासून चालत आली आहे.मानवाचे आणि उत्सवाचे नाते खूप जवळचे आहे. नित्य नाविन्यता परिवर्तनशीलता उत्साह अशा उपजत गुणामुळेच माणसाने सण-उत्सवाची परंपरा निर्माण केली. भारतीय सण-उत्सव आणि त्यांच्या निसर्गाशी असलेला अतुट संबंध आपल्या कृतीतून दिसतो. मानव समाजात अस्तित्वात असणाऱ्या विविध जाती धर्मातील, जमातीतील व त्यांच्या पोटजातीनुसार विविध सण-उत्सव साजरे केले जातात. संपूर्ण मानव समाज एकसंग राहावा जाती जमातीतील सलोखा नातेसंबंध टिकून राहावेत अशा विविध कारणास्तव हे सण-उत्सव साजरी करण्याची परंपरा निर्माण झाली.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रातील सण -उत्सवाचे स्वरूप अभ्यासणे.
२. निसर्ग संस्कृती आणि सण-उत्सवातील सहसंबंध अभ्यासणे.
३. निसर्ग पूरक सण-उत्सवातील संस्कृतीची गरज आहे ते अभ्यासणे.
४. वैज्ञानिक महत्त्व सोबतच सण-उत्सव कसे महत्त्वाचे आहेत ते अभ्यासणे.

**संशोधनाची गृहिते**

१. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सर्व सण-उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करतात.
२. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात निसर्ग पूरक सण-उत्सव साजरी केले जाते.
३. सण-उत्सव साजरे केल्याने आनंददायी वातावरण आणि मानवाचे आनंद द्विगुणीत होते.

**सण-उत्सवाचे स्वरूप**

सण-उत्सव,परंपरा रितीरिवाज या साऱ्यांचे अतूट बंधन भारतीय संस्कृतीत आढळते. परंपरा व रुढीचे संवर्धन व संक्रमण भारतीय कुटुंबातील स्त्री-पुरुष करीत असतात या पारंपरिक लोकसंस्कृतीच्या अभिव्यक्तीत स्त्रिया व तिच्या जीवन वाटचालीतून अविष्कृत होणारी संस्कारशील संस्कृती ही एक अमूल्य ठेवा आहे.

सणासुदीचे दिवस म्हटले की, आनंदाला उधाण येते हौस मौजेला पाय फुटतात. सगळीकडे कसं मंगल मांगल्याचे वातावरण पसरते मनातून समाधानाचे कारंजे उसळून वर येतात. सणाच्या निमित्ताने गोडधोड खायला

मिळते. सणासुदीच्या निमित्ताने उत्साह वाढतो. यातून मानवी मनावर आपोआप एखादा संस्कार होऊन जातो. संपूर्ण वातावरण अगदी प्रसन्न झालेले असते म्हणून सण-उत्सवाला मानवी लोकजीवनात अत्यंत महत्त्व दिले जाते. सणासुदीची सुरुवात पाडव्यापासून होते.'शिमगा गेला आणि पाडवा आला' असे म्हणतात. मग श्रावणातील नागपंचमी,पोळा,कृष्णाष्टमी,गणेश उत्सव, दुर्गोत्सव त्यानिमित्ताने प्रत्येक घराघरात घटस्थापना होते दसरा आणि दिवाळी भाऊबीज संक्रांत रंगांची उधळण करणारा शिमगा होळी हा सण येतो शिमगा झाल्यानंतर पाठोपाठ पाडवा हा सण येतो. पाडव्याची गुडी घरोघरी उभी राहते आणि शेतकऱ्यांच्या नवीन वर्षाची सुरुवात होते. हीच ती निसर्ग संस्कृतीची देणगी मानवाला मिळालेली आहे.

**निसर्ग संस्कृतीतील सण-उत्सवाचे महत्व**

माणसाच्या जीवनात जो शांतपणा. जे स्वास्थ्य असावं लागतं ते आजच्या धावपळीच्या जीवनात तो हरवून बसलेला आहे. सर्व प्रकारचे सण टप्प्याटप्प्याने साजरी करताना नातेसंबंधाची जपणूक, सकारात्मक ऊर्जा, मानवी संबंध, भक्ती, अध्यात्म ऊर्जेचा स्त्रोत मनात शांती,सकारात्मक दृष्टिकोन सणांच्या माध्यमातून निश्चितच निर्माण होतो. आपल्याकडील सर्व-सण उत्सव पाहिले तर निसर्गाशी नातं सांगणारी,जवळीक असणारी अशीच त्यांची पूर्वापार रचना आहे.अगदी मुक्या प्राण्यांप्रती आदरभाव हा आपल्याच सणांतून व्यक्त होतो.

विविध प्रकारच्या संस्कृतीने नटलेला आपला देश व आपल्या देशातील प्रत्येक सण यांचे महत्त्व आपल्या जीवनात अनन्यसाधारण आहे. वर्षाच्या सुरुवातीपासून तर अगदी अखेरपर्यंत प्रत्येक सणांचे महत्त्व व त्यावेळेस बदलणारे ऋतुमान होणार नैसर्गिक हवामानातील बदल यांची सांगडसुद्धा या सणांसोबत घातलेली प्रामुख्याने आढळते. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक धर्म यामागे कुठल्या ना कुठल्या प्रकारचा अध्यात्म व शास्त्र जोडलेला आहे.

आपला भारत हा संस्कृती प्रधान देश आहे. अनेक भाषा धार्मिक विविधता जगाच्या पाठीवर इतर कोणत्याही देशात नाही. येथील निसर्ग पाहण्यासाठी लाखो विदेशी पर्यटक भारताला भेट देत असतात.हिरवागार निसर्ग संपन्न भारत म्हणजे सणांची रांगोळी, रंगांची उधळण की येथील मातीलाही इथल्या संस्कृतीचा गंध येतो. आपण भारतीय आहोत याचा खरच खूप मनापासून अभिमान वाटतो. खूप धार्मिक अध्यात्मिक आहोत आपण अनेक धर्मांचा संगम आपल्या देशात आहे आणि आपले सण आपल्या विविधतेतील एकतेचे प्रतीक आहेत धार्मिक भावनिकदृष्ट्या सणांना आपल्या जीवनात खूप महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक सणाचा निसर्गाशी खूप जवळचा संबंध आहे.मकर संक्रांती या सणाला एकमेकांना तिळगुळ वाटण्याची परंपरा आहे हिवाळ्याच्या दिवसात तिळगुळ खाणं आरोग्यासाठी खूप हितकारक असत.

**सणांचे निसर्गाशी नाते**

आपल्याकडील सर्वउत्सव पाहिले तर हे नातं सांगणारे एकमेकाशी जवळीकता असणारे अशीच त्याची पूर्वापार रचना आहे. मुळात मानव उत्सव-प्रिय प्राणी आहे. निसर्गात मानव हा सृष्टीतील घटना क्रमात होणारे बदल निरीक्षण करून हळूहळू ओळखले. निसर्गातील प्रत्येक घटनेमागील नियम शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला त्यांचे आपल्या जीवनाशी नातं जोडण्याचा प्रयत्न केला त्यातून स्वतःला आणि इतरांना मानसिक समाधान आनंद मिळतो याची खात्री माणसाला पटली एकत्र येण्याने चर्चा, सुसंवाद घडतात त्यामुळे वैयक्तिक सामाजिक आणि सामूहिक ताणतणाव कमी होतात. समस्यावर मात करण्यासाठी बळ, पाठिंबा, उत्साह व प्रेरणा मिळते. मानवाला अनेक

अनुभव आले आणि त्याने त्या सर्व सण-उत्सवांची त्या त्या ऋतुमानानुसार संगती लावली. सृष्टीतील इतर सजीवांप्रती सतत प्रेम, भूतदया, मैत्र जपण्याच्या शुद्ध हेतूने मानव कृतज्ञते पोटी निसर्गाच्या नावाने सहभागाने सण-उत्सवाचे आयोजन केले. यातून स्वतःचा व समूहाचा आनंद द्विगुणीत करण्याचा मानवाने नेहमीच प्रयत्न केला.

**सणांचे महत्त्व**

वैज्ञानिक महत्त्व सोबतच भारतीय सण सांस्कृतिक तसेच अध्यात्मिक दृष्टया परिपूर्ण आहेत. मराठी वर्षाची सुरुवात म्हणजे गुढीपाडवा उभारून केला जातो. गुरुपौर्णिमा भारत वर्षामध्ये जेवढे गुरूला महत्त्व आहे तेवढे कशालाही नाही. गुरुच मार्गदाता, मुक्तीदाता,नागपंचमीला नागदेवता व अन्य पशुंसाठी मनाची प्रेमाची भावना ठेवणारी हीच भारतीय संस्कृती आहे.

महाराष्ट्राला ऐतिहासिकते बरोबर सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक परंपरेबरोबरच भौगोलिक समृद्धताही लाभलेली आहे. महाराष्ट्रात खानदेश, मराठवाडा, विदर्भ, कोकण, माणदेश अशा विविध भागात विविध जातीजमातींचे अस्तित्व दिसून येते. त्या त्या भागात त्या जमातींच्या चालीरीती, रुढी-परंपरा, सण-उत्सव यांचे स्वरूप थोड्याफार फरकाने वेगळे असल्याचे जाणवते महाराष्ट्राचे मराठी वर्षाचे बारा महिने आणि भौगोलिक पर्यावरणानुसार निर्माण झालेले सहा ऋतू यांच्या समीकरणातून विविध सण-उत्सव व्रत हे साजरे केले जातात. हे ऋतू व सण-उत्सव खालील प्रमाणे

१. वसंत - गुढीपाडवा, रामनवमी, हनुमानजयंती, अक्षयतृतीया, बुद्धपौर्णिमा, वसंत पंचमी.

२. ग्रीष्म - वटपोर्णिमा,आषाढी एकादशी

३. वर्षा - नागपंचमी, नारळी पौर्णिमा,रक्षाबंधन, हरितालिका, गणेश चतुर्थी.

४. शरद - दसरा, कोजागिरी पौर्णिमा, दीपावली

५. हेमंत - मार्गशीर्ष, गुरुवार व्रत, दत्त जयंती, मकर संक्रांती,रथसप्तमी.

६. शिशिर - माघी गणेश जयंती, होळी, रंगपंचमी.

सण-उत्सवाच्या मागे विशिष्ट अध्यात्माचा ठेवा आणि विज्ञानाची सुयोग्य सांगड घातलेली दिसून येते. सण-उत्सवाचा संबंध हा पवित्र्याशी जोडला जातो प्रत्येक सणाला घराची आणि परिसराची स्वच्छता दिसून येते. दाराला तोरण, दारात रांगोळी, फुलांची आरास, दिप धुपाचा सुहास असे मंगलमय वातावरण निर्माण करून वाईट गोष्टींना तिलांजली दिली जाते. यातून मानसिक आणि शारीरिक सुदृढता जोपासली जाते. माणसाचे सर्व सण-उत्सव हे पर्यावरणाच्या उपलब्धतेवरून विसंबून असून पर्यावरण आणि मानव यांचा घनिष्ठ संबंध या निमित्ताने दिसून येतो. आपले सर्व सण हे निसर्गाचे रक्षण करणारे कृषी संस्कृतीशी नाते सांगणारे आहेत. ईश्वराची पूजा भीती पोटी न करता श्रद्धेने करावी आणि निसर्ग रक्षणाच्या मूळ उद्देशाचे जतन करावे. हेच आधुनिक व्रत ठरेल.

**सारांश**

महाराष्ट्रातील रूढी, परंपरा, सण-उत्सव, निसर्ग प्रेम, जिव्हाळा, आधार, निष्ठा, श्रद्धा असते. मानवी धर्म हा निसर्ग धर्म आहे. मानवाचे लोकजीवन हे निसर्गावर अवलंबून आहे हे त्यांच्या संस्कृतीतून दिसून येते. मानवाच्या निर्मितीपासूनच निसर्गदेवता श्रद्धेने पुजले जातात त्यात कुठेही कर्मकांड नाही. मानव हा निसर्गाच्या सानिध्यात

मुक्तपणे स्वच्छंदी वावरत असतो. निसर्ग शक्तींना देव मानून मानवी मूल्ये ही जपली आहेत. मानव हा निसर्ग संस्कृतीचे जतन व संवर्धन करतो.

**निष्कर्ष:**

१. सण-उत्सवातून अध्यात्मिकता आणि वैज्ञानिक यांचा सहसंबंध आढळतो.

२. मानवी मूल्यांची जोपासना करून लोक परंपरेचा वारसा जोपासला जातो.

३. विविध सणांमधून प्रतिकात्मकता व पूजा विविधता आढळते.

४. श्रद्धा, प्रेम, सहकार्य, आदर, मानवता, भूत-दया, उत्साह अशा विविध गुणांची जपणूक झालेली दिसून येते.

५. निसर्ग विषयक जाणीव जागृती व निसर्गाचे संवर्धन केलेले दिसून येते.

६. सण-उत्सव, परंपरा रितीरिवाज या साऱ्यांचे अतूट बंधन भारतीय संस्कृतीत आढळते.

७. परंपरा व रुढीचे संवर्धन व संक्रमण भारतीय कुटुंबातील स्त्री-पुरुष करीत असतात.

**संदर्भ:**

१.भवाळकर तारा, लोकसंचित, राजहंस प्रकाशन पुणे,१९८९

२.भारतीय सण-उत्सवांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व- संपादक डॉ. डी. आर पाटील,अथर्व पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती २०१५

३.लोकसंस्कृतीची क्षितिजे - रा.चिं.ढेरे, विश्वकर्मा साहित्यालय टिळक पथ पुणे, प्रथम आवृत्ती १९७१

४.भारतीय तीर्थक्षेत्र - गजानन खोले, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे. १९६६